वन विभागातील हंगामी कामे करण्याबाबतची कार्यपध्दती.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. वनम-२०१३/प्र.क्र. ३३४/फ-९**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- ११ नोव्हेंबर, २०१६**

**शासन परिपत्रक :-**

वन विभागात वनसंवर्धन, वनसंरक्षण व इतर कामे करण्यात येत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने इमारती मालाचे निष्कासन, वनीकरण / रोपवन करणे, रोपवाटिका तयार करणे, विश्रामगृहातील कामे, आगारावरील कामे, आगीपासून वनाचे संरक्षण, डाक रनरची कामे इत्यादी कामे करण्यासाठी रोजंदारी मजूर लावण्यात येतात. रोजंदारीवर लावण्यात आलेले मजूर वर्षानुवर्षे कामांवर राहिल्यानंतर त्यांची नियमितीकरण करण्याची मागणी असते. वेळोवेळी अशी मागणी झाल्यामुळे व त्याबाबत सातत्याने मोर्चे, आंदोलन झाल्यानंतर मागील काही वर्षात शासनाकडून वनविभागात जवळपास १७००० रोजंदारी मजूरांचे नियमितीकरण करण्यात आले. त्याचप्रमाणे कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय, उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालय यांचे निर्णयानुसार देखील रोजंदारी मजूरांचे नियमितीकरण करण्यात येत असते. विभागात सर्व रोजंदारी मजूरांची माहिती ठेवावी लागते. कामे कमी झाल्यास अशा रोजंदारी मजूरांना पर्यायी कामे देखील उपलब्ध करुन द्यावी लागतात. विभागात आवश्यकतेप्रमाणे पुरेसे रोजंदारी मजूर कामासाठी उपलब्ध व्हावेत व त्याप्रमाणे नियमितीकरण करण्याची वारंवार सुरु असलेली प्रक्रिया याबाबत सखोल विचार करुन शासन निर्णय क्र. एलएबी-१०२४/प्र.क्र.२५२/फ-९, दिनांक ३१.०१.१९९६ मधील बाब क्र. ७ व शासन निर्णय क्र. बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९, दिनांक १६.१०.२०१२ मधील बाब क्र. ११ नुसार खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या होत्या.

१. हंगामी कामासाठी घ्यावयाच्या मजूरांच्या सेवा कोणत्याही परिस्थितीत ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी लागू करण्यात येवू नयेत.
२. हंगामी कामाशिवाय इतर कोणत्याही बारमाही कामावर मजूर घेण्यात येवू नयेत.

तसेच बारमाही कामावर मजूर ठेवताना कोणती कार्यपध्दती वापरावी याबाबत वेळोवेळी शासनातर्फे सूचना जारी करण्यात आल्या. वरीलप्रमाणे सूचना असताना देखील काही ठिकाणी बारमाही कामावर रोजंदारी मजूर लावण्यात आले आहेत, असे निदर्शनास येत आहे.

(२) दरम्यानच्या काळात राष्ट्रीय वन नीती, १९८८ अन्वये वन संरक्षण व वन विकासासाठी स्थानिक लोकांचा सहभाग अभिप्रेत केला असल्याने त्यानुषंगाने ग्रामिणांचा सहभाग घेण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम दिनांक १६.०३.१९९२ च्या शासन निर्णयानुसार निर्गमित करण्यात आला. सदर कार्यक्रमात वेळोवेळी सुधारणा करण्यात येवून सन २००३ व तदनंतर दिनांक ०५.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये या कार्यक्रमास ख-या अर्थाने गती निर्माण झाली. या कार्यक्रमांतर्गत जवळपास १२५०० संयुक्त वन व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली

असून त्यांचे मार्फत वनक्षेत्राचे संयुक्त व्यवस्थापन करण्यात येत आहे. याच धर्तीवर संरक्षित क्षेत्रासाठी ग्राम परिसर विकास समित्या गठित करण्यात आल्या असून वन्यजीव व्यवस्थापनाच्या कामात त्यांचा सहभाग घेण्यात येत आहे. या नमूद समित्यांना वन विभागाची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. समितीमार्फत विभागाची कामे करुन घेण्यात येतात.

(३) विभागात मजूर पदाव्यतिरिक्त करुन घ्यावयाची इतर कामे करण्यासाठी आवश्यक असणारे रोजंदारी मजूर लावणेसंदर्भात कंत्राटी वा इतर पध्दतीने मजूर लावण्यात येत होते. दरम्यानच्या काळात कामासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास बाह्यस्त्रोताद्वारे मनुष्यबळ घेण्याची कार्यवाही सुरु झाली. वन विभागातील क्षेत्रिय स्तरावर नियमित चालणा-या विविध कामासाठी आवश्यक मुनष्यबळ बाह्यस्त्रोताद्वारे घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही अवलंबण्यात यावी.

१. वन विभागात क्षेत्रीय स्तरावरील नियमितपणे चालणा-या कामासाठी लागणारे मनुष्यबळ हे बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यात यावे.
२. बाह्यस्त्रोताची निवड करताना प्रथमतः संयुक्त वनव्यवस्थापन समिती, ग्राम परिसर विकास समिती, जंगल सहकारी मजूर संस्था, राज्य शासनाच्या महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कार्पोरेशन व इतर मान्यता प्राप्त संस्था यांजकडून प्राधान्याने मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे.
३. उपरोक्त संस्थाकडून मनुष्यबळ उपलब्ध न झाल्यास खाजगी मजूर पुरवठाधारक संस्था, सुरक्षा रक्षक पुरवठा करणा-या संस्था / मनुष्यबळ पुरवठा करणा-या इतर संस्थांकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे.
४. अशा प्रकारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देतेवेळी ज्या बाह्यस्त्रोताकडून मजूर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, त्यांच्याकडे मागणी करण्यात यावी.
५. जी कामे बाह्यास्त्रोताच्या मनुष्यबळाद्वारे करण्यात येणार त्या कामासाठी उपलब्ध असलेल्या निधीच्या मर्यादेत खर्च भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्रकाश महाजन)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. मुख्य वनसंरक्षक (सर्व) / वनसंरक्षक (सर्व) / उपवनसंरक्षक (सर्व) / उपसंचालक (सर्व)
७. महालेखापाल - १/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
८. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. (निवडनस्ती)